# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 23.09.2024** **वार – सोमवार**

---

**पंतप्रधान दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या 26 सप्टेंबर रोजी पुणे दौऱ्यावर येत आहेत; त्यांच्या नियोजित दौऱ्याच्या पूर्वतयारीचा आढावा उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज मुंबईत मंत्रालयात आयोजित बैठकीत घेतला. पंतप्रधानांच्या दौऱ्याच्या अनुषंगानं जिल्हा प्रशासन, पोलिस, महानगरपालिका, आणि संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वय आणि सहकार्याने काम करावं; असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

**अजित पवार**

पुण्यातील माण-हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो तीनच्या कामांचाही अजित पवार यांनी आज मंत्रालयात आढावा घेतला. हिंजवडी-शिवाजीनगर मार्गावरील शिवाजीनगर ते औंध दरम्यानच्या कामाला गती देण्यासाठी सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी गर्डर टाकण्याच्या कामाला पोलीसांनी चोवीस तास परवानगी द्यावी; या मार्गावरची वाहतूक कोंडी टाळण्यासाठी दुमजली उड्डाणपुलाच्या खालचे रस्ते व्यवस्थित ठेवावेत असे निर्देश पवार यांनी यावेळी दिले. मेट्रो तीनच्या कामाची पाहणी करण्यासाठी येत्या 26 सप्टेंबर रोजी भेट देणार असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**मंत्रिमंडळ**

पुण्यातील लोहगाव विमानतळाचं नाव जगद्गुरु संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ पुणे असं करण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. जुन्नरमध्ये जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करणं, तसंच शिरूर ते छत्रपती संभाजीनगर या 1 हजार 486 कोटी रुपयांच्या ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्ग प्रकल्पाही आज मंत्रिमंडळानं मान्यता दिली.

**अर्थसाह्य**

पुणे महापालिका हद्दीतील इयत्ता दहावी-बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शैक्षणिक अर्थसाह्य योजना आणि भारतरत्न अब्दुल कलाम आझाद शैक्षणिक अर्थसाह्य योजना राबवली जाते. या योजनेत दहावी- बारावी उत्तीर्ण होणाऱ्या अंध, दिव्यांग, कर्णबधीर आणि मूकबधीर विद्यार्थ्यांना 65 टक्के गुणांची अट टाकण्यात आली होती. ही गुणांची अट अंध मुलांसाठी रद्द करण्यात येणार आहे. उत्तीर्ण झालेल्या प्रत्येक अंध मुलाला आता ही शैक्षणिक मदत देण्यात येणार आहे. अपंग, कर्ण आणि मूकबधिर विद्यार्थ्यांना यापुढे 55 टक्के गुणांची अट असेल. पुणे महापालिकेच्या समाज विकास विभागानं याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीकडे सादर केला आहे.

**कीटकजन्य आजार**

पुण्यात गेल्या काही दिवसांमध्ये चिकुनगुनिया, डेंग्यूसारख्या कीटकजन्य आजारांच्या रुग्णांमध्ये मोठी वाढ झाली आहे. यंदाच्या जानेवारीपासून आतापर्यंत शहरात झिका विषाणूचे 100, डेंग्यूचे 251 आणि चिकुनगुनियाचे 225 रुग्ण आढळले. महापालिकेच्या आरोग्य विभागाने संशयित रुग्णांची तपासणी आणि आजारांच्या प्रादुर्भावावर नियंत्रण याकडे बारकाईने लक्ष दिलं आहे; तरीही, वातावरणातील बदलांमुळे ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये रुग्णांमध्ये सर्वाधिक वाढ होताना दिसत आहे, असं पुणे

महापालिकेचे सहायक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे यांनी सांगितलं.

**<u>दिशा परिवार</u>**

समाजातील गरजू आणि वंचित घटकांच्या पाठीशी उभे राहून त्यांना दिशा देण्याचं काम दिशा परिवार चॅरिटेबल ट्रस्ट करत आहे, असं प्रतिपादन ज्येष्ठ गणितज्ज्ञ प्राध्यापक डॉक्टर रवींद्र कुलकर्णी यांनी नुकतंच पुण्यात केलं. दिशा परिवार चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने शैक्षणिक शिष्यवृत्ती आणि दिशा परिवार सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी 250 गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. यंदाचा दिशा परिवार सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार सामाजिक कार्यकर्ते दीपक हिरवे आणि मनीषा गाडे यांना प्रदान करण्यात आला.

**<u>अवयवदान</u>**

मेंदूमृत घोषित केलेल्या 25 वर्षीय डॉक्टरांच्या नातेवाईकांनी अवयवदानाला संमती दिल्यानंतर त्यांचे यकृत, दोन्ही मुत्रपिंड, स्वादुपिंड आणि एक कॉर्नियासह अन्य अवयव पुण्यातील विविध रूग्णालयांमध्ये प्रत्यारोपित करण्यात आले. मेंदूमृत घोषित केलेल्या व्यक्तींचं; पुणे विभागीय प्रत्यारोपण समन्वय केंद्रानं केलेलं या वर्षातलं हे 50वं अवयवदान आहे, असं पुणे अवयव प्रत्यारोपण समितीच्या समन्वयक डॉक्टर आरती गोखले यांनी सांगितलं.

**<u>अंगणवाडी संप</u>**

महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीनं मानधनवाढीसह विविध मागण्यांसाठी आंदोलनाचा इशारा दिला आहे. उद्यापर्यंत याबाबत ठोस निर्णय झाला नाही, तर परवापासून एक लाख अंगणवाडया बंद ठेवून बेमुदत संप सुरू करू असा इशारा कृती समितीचे पदाधिकारी नितीन पवार यांनी दिला आहे.

**<u>निधन</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील माहिती आणि जनसंपर्क विभागातील मुख्य लिपीक वसीम कुरेशी यांचं आज प्रदीर्घ आजाराने निधन झालं. ते 52 वर्षांचे होते.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात काल रात्री मुसळधार पाऊस पडला. आज शहरात अधून मधून पावसाच्या सरी आल्या. उद्याही ढगाळ हवामान असेल, तसंच वीजांसह हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**